## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१७/०३/२०१९
## दि.१६/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे २३७/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | सौ.अरुणा दुधाने,वय- ३५ वर्षे,रा.सुमन संकल्प सोसायटी,फ्लॅट नं.सी-४०१,राम मंदिरा जवळ, आंबेगाव-बुद्रुक,पुण्से |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०३/१९ रोजी १०/१५ वा.ते दि.१६/०३/१९ रोजी ०७/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे राहते फ्लॅटला कुलुप लावुन बंद करून त्यांचे माहेरी बाजारवाडी, ता.भोर,जि.पुणे येथे गेले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ४०,०००/- रूपये रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ३,५९,०००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.एल.नलवडे ९९२१२१३७१६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ११२/१९,भादविक ४०६,४२०,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५० वर्षे,रा.२५७,बुधवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | विविध संस्थेचे इसम व महिला मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे मे २०१३ ते आजपावेतो फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद विविध संस्थेचे इसम व महिला मोबाईलधारक यांनी फिर्यादी यांना फोन करून तुमचे सास-यांचा ९ लाख रुपयेचा फंड असुन,त्या फंडाची रक्कम आपले खात्यात जमा करावयाची असल्याने आपणास पॉलिसी व एन.ओ.सी. काढावी लागेल,तसेच इन्कम टॅक्स भरावा लागेल असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,त्यांना वेग-वेगळी कारणे सांगुन,त्यांच्याकडुन वेळोवेळी रोख व सोन्याचे स्वरुपात तसेच आर.टी.जी.एस.द्वारे एकुण १,६८,११,६१९/- रुपये घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वाय.पी.सुर्यवंशी ९४०५९५५३२६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ११५/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६७,रा.सदाशिव पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी दु.१२/३० वा. ते १८/०० वा.चे दरम्यान सदाशिव पेठ,पुणे येथील ऑफीस मध्ये ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे ऑफीस मध्ये असताना,यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादीस फोन करून,त्यांना बँकेचे क्रेडीट कार्डाचे रिवॉर्ड पॉईंटस ९,५००/- रूपये रोख स्वरूपात करून देतो असे खोटे अमिष दाखवुन,फिर्यादी व त्यांचे पत्नीचे क्रेडीट कार्ड याची माहिती व मोबाईलवरील ओटीपी नंबरची माहिती प्राप्त करून घेवुन,त्याव्दारे १८,६९९/- व १८,९६९/- असे एकुण ३७,६६८/- रूपयाची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. म्हस्के ९८९००५२९७० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ११८/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | संदिप कुलकर्णी,वय-३४,रा.वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०१८ ते दि.२९/०८/२०१८ रोजीपर्यंत लोकमान्यनगर,नवी पेठ,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी नवी पेठ,पुणे येथे असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे नांव, फोटो व कागदपत्रे त्यांचे परवानगीशिवाय कोठुन तरी प्राप्त करून,फिर्यादी यांचे बँकेत बनावट खाते उघडुन,त्यांचे क्रेडीट कार्डाची माहिती त्यांचे परवानगीशिवाय प्राप्त करून घेवुन,क्रेडीट कार्डावरून एकुण ९०,३३४/- रूपये रक्कम स्वतःचे फायदयाकरीता वेग-वेगळया मर्चटव्दारे ऑनलाईन ट्रान्सफर करून फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. कलगुटकर ९८९२२३८५९७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १८३/१९,भादविक ४०८ |
| **फिर्यादी** | प्रदिप बघेल,वय-२६ वर्षे,रा.गलांडेनगर,वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/२०१८ रोजी १९/०० वा. ते दि.२५/०८/२०१८ रोजी १६/०० वा.पर्यंत मोदी प्लाझा स्वारगेट येथे जना मायक्रा फायनान्स बँकेचे कार्यालयात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे स्वारगेट येथे एरीया कलेक्शन मॅनेजर या पदावर नोकरीस असुन,त्यांची बँक गरजु होतकरु महीलांना घरगुती व्यावसाय करण्यासाठी कर्ज देते व त्यांची फेड सुलभ हप्त्याने करुन घेत असते. सदरची रक्कम त्यांचेकडुन वसुल करणेसाठी कलेक्शन व रिकव्हरी मॅनेजर यांची नियुक्ती केलेली असुन,ते महीलांचे घरी जाऊन कर्जफेड रक्कमेची वसुली करतात. यातील नमुद इसम याचेकडे फायनान्स बँकेने कर्ज वसुली करण्याची जबाबदारी दिलेली असताना,त्याने महीलांकडुन कर्ज वसुलीचे पैसे घेऊन,ते पैसे ऑफिसला जमा न करता,एकुण ४२ महीलांचे कर्ज हप्त्याचे एकुण २,९५,०६५/- रोख रक्कमेचा अपहार करून त्याची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एन.शेख ९६८९९३४२८६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे २०३/१९,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५५ वर्ष,रा.संगमवाडी पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सप्टेंबर २०१४ ते आज दिनांक १६/०३/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात इसम व महिला यांनी संगनमत करून,फिर्यादी यांना ॲटो ट्रॅक कंपीनमध्ये १,६०,०००/- रुपये भरल्यानंतर तीन महिन्यात भरलेल्या रक्कमेचा परतावा म्हणुन १३,००,०००/- रुपये कंपनी कडून मिळतात असे खोटे आश्वासन देवून,फिर्यादी यांचेकडून १,६०,०००/- रुपये रोख रक्कम घेतली. सदर रक्कमेचा परतावा फिर्यादी यांनी त्याचेकडे मागितला असता, त्याने सदरची रक्कम कंपनीकडून परत मिळवण्यासाठी कंपनीत पुन्हा काही रक्कम भरावी लागते असे सांगून टप्प्या-टप्प्याने पुहा फिर्यादी यांचेकडुन १,००,०००/- रुपये घेवुन,त्यांना भरलेल्या रक्कमेचा परतावा न देता,फिर्यादी यांची फसवणु केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आनंदसिंग साबळे |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ११४/१९,भादविक ४०८, ४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३९ वर्षे,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | रोहन रावसाहेब निकम,वय-२३ वर्षे,रा.साळुंखे विहार रोड,इंदिरा गांधी वसाहत,वानवडी,पुणे |

| | |
|---|---|
| | (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै-२०१७ पासुन ते आजपावेतो वेळोवेळी ॲमेझॉन डेव्हलपमेंट सेंटर,सोमनाथनगर, वडगाव-शेरी,पुणे येथे |
| **तपशिल** | ॲमेझॉन डेव्हलपमेंट सेंटर,सोमनाथनगर,वडगाव-शेरी,पुणे येथील कस्टमर सर्व्हीस असोसिएट या पदावर काम करणाऱ्या यातील नमुद इसमाने कंपनीचे गिफ्ट कार्ड वापरा संदर्भात,त्याला विश्वासाने दिलेल्या अधिकारांचा गैर-वापर करुन १,८५,०१,०००/- रुपये इतक्या किंचे गिफ्ट कार्ड वाटुन,त्यापैकी एकुण ३१,२७,०७२/- रुपये इतक्या किंचे कंपनीचे गिफ्ट कार्डचा गैर-वापर करुन,स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कंपनीची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिठ पो.निरी. कृष्णा इंदलकर ९८३४२९८८८३ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २५०/१९,भादविक ४२०,३७९ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-२,रा.वडाचीवाडी रोड,उंन्ड्री पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम वय अंदाजे २७ ते ३० वर्षाचे दरम्यान, रंगाने गोरा, डोक्यात टोपी व अंगात ब्लेझर घेतलेला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०३/२०१९ रोजी २०/०० ते २०/३० वा.चे दरम्यान न्यु सायबर गॅलेरी,शॉप नं.९ दोरा बजी इनक्लेव्ह,साळुंके विहार रोड,कोंढवा-खुर्द येथील ट्रॅव्हल्स बुकींग,मनी ट्रान्स्फर, मोबाईल ॲन्ड कम्प्युटर सेल ॲन्ड सर्व्हिस या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे न्यु सायबर गॅलेरी येथे मनी ट्रान्सफरींगचे दुकानात काम करीत असताना यातील नमुद वर्णनाचे अनोळखी इसमाने फिर्यादीस भारतीय चलनाच्या २०००/-रु व ५००/-रु दराच्या नोटा व सौदी अरेबीया या देशाची ५००/- दराची नोट बघण्याचा बहाणा करुन त्यातील अमेरीकन १०० डॉलर हे एक्सचेंज करून घेऊन,फिर्यादी यांचेकडे भारतीय चलनातील ५००/- व २००/- रुपये दराच्या नोटांची मागणी करुन,त्यांना अमेरीकन डॉलर दाखवण्याचा बहाणा करून,फिर्यादी यांचे लक्ष विचलीत करुन,त्याला बघण्यासाठी दिलेल्या नोटांपैकी अमेरीकन २४०० डॉलर पैकी १९०० डॉलर हे हातचलाखी करुन,फिर्यादी यांची फसवुण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. नितीन बोधे ८३६९६०९७२२ |
| ९ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २५५/१९,भादविक ४१९,४२०, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्या बाबत अधि.१९६० चे कलम ११ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६८ वर्षे,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | वेटर्निटी डॉक्टर सांगणारा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०३/२०१९ रोजी १७/०० वा.बी-२०३,एकता रेसिडेन्सी,स.नं.४७,शालीमार हिल्स जवळ, कोंढवा-खुर्द,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद वेटर्निटी डॉक्टर सांगणारा इसमाने,तो वेटर्निटी डॉक्टर नसताना,वेटर्निटी डॉक्टर आहे असे भासवुन,दि.०१/०३/२०१९ रोजी फिर्यादी यांची पाळीव श्वान हिचेवर उपचार केल्यानंतर,सदर श्वान हीस क्षतीकारक औषधी द्रव्ये दिल्यामुळे तीची प्रकृती न सुधारता ती अधिकच आजारी झाली आहे. तरी सदर इसमाने बनावट वेटर्निटी डॉक्टर असल्याचे भासवुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.शिंदे ९९२२९५५४७० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**